RNI Regn no.- MAHBIL/2013/54875 Post Regd.No.-ATI/RNP/3337/2025-2027

सोशल मिडीया Edition

साप्ताहिक

# नव प्रहार

भ्रष्ट व्यवस्थेवर लेखणीचा दणका

सोशल मिडीया Edition
मुख्य संपादक:-संजय पांडे मो.८५५२९५८५५५ navprahar2013@rediffmail.com

## धोक्याची घंटा! शहानूर प्रकल्पातील पाणीसाठा 35 टक्क्यांवर नागरिकांनी प्रत्येक थेंब जपण्याची वेळ

### केवळ 35 टक्के जलसाठा शिल्लक; ऑगस्टनंतर परिस्थिती गंभीर होण्याची शक्यता, नागरिकांना पाणी जपून वापरण्याचे आवाहन

**नवप्रहार प्रतिनिधी / अनिल गौर**

**अंजनगाव सुर्जी** – शहरासह परिसरातील हजारो नागरिकांची तहान भागविणाऱ्या शहानूर प्रकल्पातील जलसाठा झपाट्याने कमी होत असल्याने पाणीपुरवठ्याबाबत चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. सध्या धरणात केवळ 35 टक्के पाणीसाठा उपलब्ध असून, उपलब्ध साठा केवळ ऑगस्ट महिन्यापर्यंतच पुरेल, असा अंदाज महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने व्यक्त केला आहे. त्यामुळे आगामी काळात पाणीटंचाईची तीव्रता वाढू नये, यासाठी नागरिकांनी आतापासूनच पाण्याचा काटकसरीने वापर करणे आवश्यक असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.



शहानूर प्रकल्प हा अंजनगाव सुर्जी शहराच्या पाणीपुरवठ्याचा मुख्य आधार मानला जातो. मात्र यंदा उपलब्ध जलसाठा अपेक्षेपेक्षा कमी असल्याने प्रशासनाची चिंता वाढली आहे. सध्या उपलब्ध असलेल्या पाण्याचे योग्य नियोजन केल्यासच पुढील काही आठवडे सुरळीत पाणीपुरवठा शक्य होणार असल्याचे अधिकाऱ्यांचे मत आहे.

अंजनगाव सुर्जी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे उपकार्यकारी अभियंता अनिकेत केलो यांनी नागरिकांना पाणी ही अमूल्य संपत्ती समजून तिचा अत्यंत जबाबदारीने वापर करण्याचे आवाहन केले आहे. घरगुती वापरात पाण्याची नासाडी टाळणे, नळांना तोट्या बसविणे, गळती आढळताच ती त्वरित दुरुस्त करणे आणि आवश्यक तेवढेच पाणी वापरणे, या बाबींवर विशेष भर देण्याचे त्यांनी सांगितले आहे.

याशिवाय भाज्या किंवा धान्य धुतल्यानंतर उरलेले पाणी झाडांना वापरणे, वाहने धुणे, अंगणात पाणी शिंपडणे किंवा इतर अनावश्यक कामांसाठी पाण्याचा वापर टाळणे, अशा सवयी अंगीकारण्याचे आवाहनही करण्यात आले आहे. प्रत्येक नागरिकाने पाण्याची बचत करण्याची जबाबदारी स्वीकारल्यास उपलब्ध जलसाठा अधिक काळ टिकवून ठेवणे शक्य होईल, असा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला आहे.

दरम्यान, पाण्याची उपलब्धता लक्षात घेऊन महाराष्ट्र जीवन प्राधिकरण परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवून आहे. आवश्यकतेनुसार पुढील उपाययोजना करण्यात येणार असल्याचेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता प्रशासनाच्या सूचनांचे पालन करून पाण्याचा जाणीवपूर्वक व मितव्ययी वापर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे. जलसाठ्याची सद्यस्थिती पाहता प्रत्येक थेंब मौल्यवान ठरत असून, सामूहिक सहकार्याशिवाय संभाव्य पाणीसंकटावर मात करणे कठीण असल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे.

## निराधार अनुदान रखडले; अडीच महिन्यांपासून लाभार्थी आर्थिक मदतीपासून वंचित



### वृद्ध, दिव्यांग व विधवा महिलांवर उपासमारीची वेळ; प्रशासनाच्या उदासीनतेबद्दल नाराजी

### लाडकी बहीण योजनेचे हप्ते नियमित; मात्र निराधार, श्रावणबाळ व विधवा वेतन रखडल्याने लाभार्थ्यांमध्ये संताप

### विकास ठप्प, अनुदान रखडले; ग्रामीण भागात संताप वाढला

**अंजनगाव बारी /पवन इंगोले**

परिसरासह जिल्ह्यातील संजय गांधी निराधार, श्रावणबाळ, विधवा वेतन आदी योजनांचे अनुदान मागील अडीच महिन्यांपासून रखडल्याने हजारो लाभार्थी आर्थिक संकटात सापडले आहेत. शासनाच्या या महत्त्वाच्या योजनांवर उदरनिर्वाहासाठी अवलंबून असलेल्या वृद्ध, दिव्यांग, निराधार व्यक्ती व विधवा महिलांना दैनंदिन खर्च भागविणेही कठीण झाले आहे.

एकीकडे राज्य शासनाकडून विविध योजनांचे हप्ते नियमित वितरित होत असल्याचे चित्र असताना, दुसरीकडे समाजातील सर्वात गरजू घटकांसाठी असलेल्या निराधार योजनांचे अनुदान रखडल्याने लाभार्थ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. अनेक कुटुंबांचा घरखर्च, औषधोपचार व जीवनावश्यक गरजांचा आधार हेच अनुदान असल्याने त्यांच्या समोर उपासमारीची वेळ येण्याची भीती निर्माण झाली आहे.

विशेषत: वृद्ध नागरिक, दिव्यांग व्यक्ती आणि विधवा महिलांना या दिरंगाईचा सर्वाधिक फटका बसत आहे. अनेक लाभार्थ्यांकडे उत्पन्नाचे कोणतेही स्थिर साधन नसल्याने शासनाच्या या मदतीवरच त्यांचा संपूर्ण उदरनिर्वाह अवलंबून आहे. अनुदान न मिळाल्यामुळे कर्ज काढणे, उधारी करणे किंवा आवश्यक खर्च टाळणे अशा परिस्थितीला त्यांना सामोरे जावे लागत आहे.

दरम्यान, जिल्हा परिषदेत प्रशासक राजवट असताना ग्रामीण स्तरावरील राजीव गांधी व विविध शासकीय योजनांच्या स्थानिक समित्या केवळ कागदावरच असल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे. लाभार्थ्यांच्या अडचणी शासनापर्यंत पोहोचविण्यासाठी सक्षम यंत्रणा नसल्याने समस्या अधिक गंभीर बनत असल्याचे बोलले जात आहे.

रखडलेले अनुदान तातडीने वितरित करून लाभार्थ्यांना दिलासा द्यावा, तसेच भविष्यात अशा प्रकारची दिरंगाई होऊ नये यासाठी प्रशासनाने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी लाभार्थी व सामाजिक संघटनांकडून करण्यात येत आहे.

## होर्मुझ पुन्हा बंद, तेहरानचा कडक इशारा



**न्युयार्के**- स्ट्रेट ऑफ होर्मुझ बाबत एक मोठी बातमी समोर आली आहे. इराण-अमेरिका करार धोक्यात आला आहे. इराणच्या संयुक्त लष्करी कमांडने, संघर्ष संपवण्यासाठीच्या सामंजस्य कराराचे अमेरिकेने केलेले उल्लंघन, दक्षिण लेबनॉनमधून सैन्य मागे घेण्यास आलेले अपयश आणि इस्त्रायलकडून शस्त्रसंधीचे सतत होणारे उल्लंघन, ही कारणे देत होर्मुझच्या सामुद्रधुनीतून होणारी जलवाहतूक बंद करण्याची घोषणा केली आहे. या घोषणेमुळे आता जागभरात पुन्हा खळबळ उडाली आहे.इराणने याला पहिले पाऊल म्हटले असून, उल्लंघन सुरूच राहिल्यास पुढील पावले उचलली जातील असा इशारा दिला आहे. अमेरिका आणि इराणने या आठवड्यात एका सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली होती, यामुळे होर्मुझची सामुद्रधुनी पुन्हा उघडण्यात आली. या कराराला अजून एक आठवडाही पूर्ण झालेला नाही. दरम्यान, अमेरिका आणि इराण यांच्यात शस्त्रसंधी करार झाल्याची बातमी आल्यानंतर काही तासांतच, शनिवारी दक्षिण लेबनॉनमध्ये इस्त्रायलने केलेल्या हल्ल्यात दोन मुलांसह किमान सात जण ठार झाले.इराणने होर्मुझच्या सामुद्रधुनीवर पुन्हा निर्बंध लादल्यामुळे कराराभोवतीचे संकट अधिकच गडद झाले आहे. दरम्यान, पाकिस्तानचे गृहमंत्री मोहसिन नक्वी शनिवारी इराणमध्ये दाखल झाले. वॉशिंग्टन आणि तेहरान यांनी शांतता प्रस्थापित करण्याच्या उद्देशाने एका करारावर स्वाक्षरी केल्यानंतर काही दिवसांतच त्यांचा हा दौरा होत आहे. इराण आणि अमेरिका यांच्यात सुरू असलेल्या वाटाघाटींवर नक्वी देखरेख ठेवतील आहे.

## आशा मनीषा मंदिर पुलावरील खोलीकरणाच्या नावाखाली चंद्रभागा नदीतील मातीची अवैध विक्री?

### नागरिकांकडून चौकशीची मागणी

**दर्यापूर** – शहरातील चंद्रभागा नदीवरील आशा मनीषा मंदिराजवळील पुलाच्या परिसरात सुरू असलेल्या खोलीकरण व सुंदरीकरणाच्या कामावरून नवीन वाद निर्माण झाला आहे. नदीतील गाळ व माती काढण्यास प्रशासनाने परवानगी दिली असताना, त्या कामाच्या आडून मोठ्या प्रमाणावर मातीची अवैधरित्या विक्री होत असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, चंद्रभागा नदीवरील आशा मनीषा पुलाजवळ दरवर्षी पावसाळ्यात नदीच्या प्रवाहामुळे मोठ्या प्रमाणात कचरा, झाडांच्या काटक्या व इतर अडथळे साचतात. त्यामुळे नदीच्या प्रवाहाला अडथळा निर्माण होण्यासोबतच पुलाच्या संरचनेलाही धोका निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात होती. या पार्श्वभूमीवर आशा मनीषा मंदिराशी संबंधित कार्यकर्त्यांनी तहसील प्रशासनाकडे लोकवर्गणीतून नदीचे खोलीकरण करण्याची मागणी केली होती.

तहसील प्रशासनाने आवश्यक परवानगी दिल्यानंतर नदीतील गाळ काढण्याचे काम सुरू करण्यात आले. मात्र, खोलीकरणाच्या नावाखाली नदीतील गाळयुक्त माती ट्रॅक्टरद्वारे बाहेर काढून तिची विक्री केली जात असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. नागरिकांच्या म्हणण्यानुसार, दररोज अंदाजे 20 ते 40 ट्रॅक्टर माती बाहेर नेली जात असून प्रत्येकी 400 ते 500 रुपयांप्रमाणे विक्री केली जात असल्याचे सांगितले जात आहे.

या प्रकाराची माहिती मिळताच काही नागरिकांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली. तसेच वस्तुस्थिती समोर यावी यासाठी पत्रकार आणि महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांनाही बोलावण्यात आल्याचे समजते. नागरिकांनी प्रशासनाकडे संपूर्ण प्रकरणाची



निष्पक्ष चौकशी करून संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे की, मंदिर परिसराच्या सुरक्षिततेसाठी व नदीचा प्रवाह सुरळीत ठेवण्यासाठी खोलीकरणाचा उपक्रम स्वागतार्ह आहे. मात्र, शासनाकडून मिळालेल्या परवानगीचा वापर करून नदीतील गौण खनिज अथवा मातीची व्यावसायिक विक्री करणे हे कायद्याच्या चौकटीत तपासण्याचा विषय आहे. त्यामुळे परवानगीच्या अटींचे पालन झाले का, तसेच नदीपात्रातून काढण्यात आलेल्या मातीचा वापर नेमका कुठे व कशासाठी करण्यात आला, याची सखोल चौकशी होणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.

दरम्यान, या प्रकरणाची माहिती उघडकीस आणण्यासाठी काही सामाजिक कार्यकर्ते व संघटनांनी पुढाकार घेतल्याचे सांगितले जात असून, छावा संघटनेचे विपिन पाटील गावंडे यांनीही या विषयात सहभाग घेतल्याची चर्चा परिसरात सुरू आहे.

सदर प्रकरणात प्रशासनाने वस्तुस्थितीची पडताळणी करून आवश्यक ती कारवाई करावी, अशी मागणी आता नागरिकांकडून जोर धरत आहे. चौकशीअंती सत्य परिस्थिती समोर येणार असल्याने नागरिकांचे लक्ष या प्रकरणाकडे लागले आहे.

## नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील शेतकरी पिक विम्यापासून वंचित; शासनाच्या धोरणाविरोधात संताप

### पिक विम्यातून नांदगाव खंडेश्वर तालुका वगळला; संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांमध्ये संताप

**नांदगाव खंडेश्वर, /उत्तम ब्राम्हणवाडे**

सततची नापिकी, अतिवृष्टी, अवकाळी पाऊस आणि विविध नैसर्गिक आपत्तींचा सामना करत असलेल्या नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील शेतकऱ्यांना 2025-26 या वर्षाच्या पिक विमा योजनेतून वगळण्यात आल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.आधीच आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांसाठी शासनाचा हा निर्णय




अन्यायकारक असून त्यांच्या जखमेवर मीठ चोळणारा असल्याची भावना व्यक्त होत आहे.

नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील अनेक गावांमध्ये पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असताना शेतकऱ्यांना विमा संरक्षणापासून वंचित ठेवणे हे शासनाच्या आडमुठ्या आणि शेतकरीविरोधी धोरणाचे उदाहरण असल्याचा आरोप शेतकरी करीत आहेत. नैसर्गिक संकटांमुळे उत्पादन खर्च वाढला, उत्पन्न घटले आणि कर्जाचा बोजा वाढला असताना पिक विमा हीच शेतकऱ्यांची शेवटची आशा होती. मात्र तीही हिरावून घेतल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत.शेतकरी संघटना व ग्रामस्थांनी शासनाकडे त्वरित हस्तक्षेपाची मागणी केली असून, अन्यथा तीव्र लोकआंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे.

सततच्या नापिकीमुळे शेतकरी आधीच अडचणीत आहे. अशा परिस्थितीत पिक विम्यापासून वंचित ठेवणे हा शेतकऱ्यांवर अन्याय आहे. शासनाने तातडीने निर्णयाचा फेरविचार करून तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांना विमा संरक्षण द्यावे.

-**किशोर राऊत,**
शेतकरी लोणी टाकळी, नांदगाव खंडेश्वर

नैसर्गिक आपत्तींचा सर्वाधिक फटका शेतकऱ्यांनाच बसतो. पिक विमा मिळाला नाही तर शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान भरून काढणे अशक्य होईल. शासनाने शेतकऱ्यांच्या भावना लक्षात घेऊन तातडीने योग्य निर्णय घ्यावा.

-**दिपक बोबडे,** स्थानिक शेतकरी

